महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
५, बी. जे. रोड, नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११००१
दुरध्वनीक्र.०२०-२६१२२८४६/४७, Email:-comm_audit@rediffmail.com

जा.क्र.स.आ./लेप.१९(३)/ले.प. काम आढावासभा (V.C)/इतिवृत्त/ 233 /२०२३, दि. ०६/०३/२०२३

प्रति,
विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व),
विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था(लेखापरीक्षण), (सर्व),
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व),
जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था, (सर्व)

**विषय : मा.अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अध्यक्षतेखाली दि.०१/०२/२०२३ रोजी घेण्यात आलेल्या लेखापरीक्षण कामकाजा बाबत दुरचित्रवाणी परिषद(V.C) आढावा सभेचे इतिवृत्त.**

वरिल विषयान्वये आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

मा. अपर आयुक्त व विशेष निबंधक, महाराष्ट्र राज्य, पुणे, यांचे अध्यक्षतेखाली दि. ०१/०२/२०२३ रोजी सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरिक्षण), जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, व जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था यांची आढावा सभा घेण्यात आली. सदर सभेचे इतिवृत्ताची प्रत सोबत जोडली आहे. तरी सदर इतिवृत्तातील विषयनिहाय निर्देशान्वये आपल्या स्तरावरुन पुढील उचित कार्यवाही करण्यात यावी व त्याचा अनुपालन अहवाल निर्धारित मुदतीत या कार्यालयास सादर करणेत यावा.

**सोबत : सभा इतिवृत्त प्रत**

(ज्ञानदेव मुकणे)
अपर निबंधक (लेखापरीक्षण),
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,पुणे

F:/vaishali/meeting info/letter.doc

## दूरचित्रवाणी परिषद (V.C.)

दि.१/२/२०२३

### सभा इतिवृत्त

**विषय** :- मा. अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अध्यक्षतेखाली दि.०१/०२/२०२३ रोजी दुपारी ४.०० वाजता आयुक्तालयाचे सभागृहात **लेखापरीक्षण कामकाजाबाबत दूरचित्रवाणी परिषद (V.C.)** (व्दारे) घेण्यात आलेल्या आढावा सभेचे इतिवृत्त

सदर सभेस खालीलप्रमाणे अधिकारी उपस्थित होते.

श्री. सदानंद वुईके- विशेष लेखापरीक्षक, वर्ग-१,सहकारी संस्था, मुख्यालय, पुणे

सदर बैठकीत खालील प्रमाणे सूचना देण्यात आल्यात.

| अ. क्र. | विषय | करावयाची कार्यवाही | कार्यवाही करणारे जबाबदार अधिकारी | कार्यवाहीचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | सन २०२१-२२ अखेरील लेखापरीक्षण कामकाजाचा आढावा | १) ज्या सहकारी संस्थांनी ठराव केलेले नाहीत व ठराव केलेले आहेत परंतु लेखापरीक्षण केलेले नाही, लेखापरीक्षण अहवाल प्राप्त नाही, लेखापरीक्षकांनी संमती दिलेली नाही व संमती देवुनही लेखापरिक्षण केलेले नाही अशा संस्थांचे कलम ८१(१)(अ) च्या प्रथम परंतुकाखाली आदेश निर्गमणासाठी संबंधित निबंधकांकडे दि.६/०२/२०२३ पर्यत यादया देणेत याव्यात.<br>२) अशाप्रकारच्या राज्यस्तरीय संस्थांची यादी तात्काळ सहकार आयुक्तालयास सादर करावी.<br>३) संस्थेला नोटीस दिल्यानंतर व त्याना सुनावणीची वाजवी संधी दिल्यानंतरच परंतुकाखाली आदेश निर्गमीत करण्याची कार्यवाही करण्यात याव्यात.<br>४) दि.१०/०२/२०२३ पर्यत संबंधित संस्थांना कलम ८१ (१) (अ) प्रथम परंतुकानुसार नोटीसा बजावणेत याव्यात.<br>५) दि.१७/०२/२०२३ पर्यत संबंधित संस्थांची सुनावणी घेण्यात यावी व दि.२४/०२/२०२३ पर्यत आदेश निर्गमीत करणेत यावेत.<br>६) अशा प्रकारच्या यादया तयार करताना वित्तीय संस्थांना प्रथम प्राधान्य देण्यात यावे.<br>७) आयुक्त कार्यालयाकडील पत्र दि.२२/०९/२०२२ अन्वये पुरविण्यात आलेल्या विहीत नमुण्यात वार्षिक लेखापरीक्षण नोंदवही (ऑडीट रजिस्टर) अदययावत ठेवण्यात यावे. तसेच या | जिल्हा उपनिबंधक व जिल्हा विशेष लेखापरीक्षक<br><br>विभागीय सहनिबंधक (लेप) | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | कार्यालयाचे पत्र दि.०९/१२/२०२२ नुसार सदर प्रकरणाचा प्रगती अहवाल विभागीय सहनिबंधक (लेखापरीक्षण) यांनी सहकार आयुक्तालयास सादर करावा.<br>८) जिल्हा उपनिबंधक व जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांची संयुक्त बैठक दि.२/२/२०२२ रोजी सकाळी ११ वाजता घेणेत यावी व दुपारी ४ वाजेपर्यत सहकार आयुक्तालयास अहवाल सादर करावा.<br>९) राज्यस्तरिय संस्थांचे कलम ८१(१)(अ) परंतुका खाली लेखापरिक्षक नियुक्ती करिता सहकार आयुक्तालयास अशा संस्थांची यादी तात्काळ सादर करावी. | जिल्हा उपनिबंधक व जिल्हा विशेष लेखापरीक्षक<br><br>जिल्हा उपनिबंधक व जिल्हा विशेष लेखापरीक्षक | |
| २. | कलम ८१(१)(अ) अन्वये संस्थांनी नियुक्ती केलेल्या व संमती दिलेल्या सनदी/ परिव्यय लेखापाल, सनदी/परिव्यय लेखापाल फर्म, शासकीय लेखापरीक्षक व प्रमाणित लेखापरीक्षकांवर कारवाई करणेबाबतचा आढावा. | १) प्रमाणित लेखापरिक्षक, सनदी/ परिव्यय लेखापाल, सनदी /परिव्यय लेखापाल फर्म व शासकीय लेखापरिक्षक यांनी संस्थेने केलेल्या नियुक्तीनुसार व लेखापरीक्षणास संमती देवूनही लेखापरीक्षण पूर्ण करून लेखापरीक्षण अहवाल सादर केले नाहीत अशा लेखापरिक्षकांची यादी सहकार आयुक्तालयास सादर करून त्यांचे नाव नामतालिकेतून कमी करणेचा प्रस्ताव आयुक्तालयास सादर करावा.<br>२) शासकिय लेखापरिक्षकांनी संस्थेने केलेल्या नियुक्तीनुसार व दिलेल्या संमतीनुसार लेखापरीक्षण पूर्ण करुन अहवाल सादर केलेले नसल्यास त्यांचे विरुध्द कर्तव्यात कसूर करणे बाबत महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार कारवाईचे प्रस्ताव विभागीय सहनिबंधक (लेखापरीक्षण) व सहकार आयुक्तालयास सादर करावेत. | जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विशेष लेखापरीक्षक<br><br>जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विशेष लेखापरीक्षक | |
| ३. | चाचणी लेखापरीक्षण, फेरलेखापरीक्षण व फिरते पथक तपासणी कामकाज आढावा | १) सदरचे लेखापरिक्षण/ तपासणी पुर्ण न केलेल्या संस्था किती आहेत व त्या शिल्लक का राहिलेल्या आहेत याबाबत जिल्हा उपनिबंधक व जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांचे बैठकीत चर्चा करण्यात यावी. तसेच शिल्लक संस्था प्रकार, लेखापरीक्षक व संस्थांचे नावासह यादी सादर करावी.<br>२) विभागीय सहनिबंधक (प्रशासन) व विभागीय सहनिबंधक (लेखापरिक्षण) यांनी नियमितपणे याबाबत कामकाजाचा आढावा घेणेत यावा.<br>३) शासनाने स्थगिती दिलेल्या चाचणी/ फेर लेखापरीक्षण/भरारी पथक तपासणी प्रकरणी स्थगिती उठविण्याकरीता | जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विशेष लेखापरीक्षक<br><br>विभागीय सहनिबंधक (प्रशा/लेप)<br><br>जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विशेष लेखापरीक्षक | दि.२/२/२०२३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | शासनाकडे दिवाणी अर्ज सादर करुन स्थगिती उठविणेची विनंती करणेत यावी. | | |
| | | ४) न्यायालयीन स्थगिती असलेल्या प्रकरणात दिवाणी अर्ज सादर करुन स्थगिती उठविण्यासाठी संबंधित जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ चे अधिकारी यांनी मा.न्यायालयास विनंती करावी. | जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विशेष लेखापरीक्षक | |
| | | ५) दप्तर उपलब्ध नाही म्हणून ज्या संस्थांचे सदरचे लेखापरीक्षण अदयाप झालेले नाही, अशा संस्थाविरुध्द कलम ८० च्या तरतुदीनुसार तात्काळ उचित कार्यवाही प्रस्तावित करावी. कलम ८० ची कार्यवाही करुनही दप्तर उपलब्ध न झाल्यास परिस्थितीनुसार संबंधितांविरुध्द सहकार कायदा कलम १४६ व १६० मधील तरतूदीनुसार तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. | जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विशेष लेखापरीक्षक<br>जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विशेष लेखापरीक्षक | |
| | | ६) ज्या लेखापरीक्षकांनी लेखापरीक्षण अहवालाची छाननी केलेली आहे त्यांनाच चाचणी /फेरलेखापरीक्षण व भरारी पथक तपासणी करण्यासाठी नियुक्तीचे आदेश देण्यात येवू नयेत. | जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विशेष लेखापरीक्षक | |
| | | ७) एकाच लेखापरीक्षकाला जास्त संस्थांचे फेर/चाचणी लेखापरीक्षण करण्याचे आदेश देवू नयेत. त्यापुर्वी त्यांचेकडील प्रलंबीत लेखापरिक्षण कामकाज व इतर कामकाजाचा प्राधान्याने विचार करणेत यावा. | जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विशेष लेखापरीक्षक | |
| | | ८) चाचणी लेखापरीक्षण, फेरलेखापरीक्षण व फिरते पथका कडील तपासणी विहीत मुदतीत पूर्ण करावी. सदरचे लेखापरिक्षण / तपासणी पूर्ण न करणा-या लेखापरीक्षकांचे विरुध्द संबंधीत निबंधकांनी संबंधीत विभागीय सहनिबंधक (लेखापरिक्षण) व सहकार आयुक्तालयाकडे कारवाईचे प्रस्ताव वेळीच सादर करावेत. | जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विशेष लेखापरीक्षक | |
| | | ९) राज्यस्तरीय संस्थांचे चाचणी/ फेरलेखापरिक्षण व भरारी पथक तपासणी अहवाल सहकार आयुक्तालयास तात्काळ सादर करावेत. | | |
| ४ | विशेष अहवालावर कारवाई | १) ज्या संस्थांचे विशेष अहवालावर संबंधीत निबंधकांनी कारवाई केलेली नाही अशा संस्थांची यादी संबंधित निबंधकांचे नावांसह सहकार आयुक्तालयास तात्काळ सादर करावी. | जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विशेष लेखापरीक्षक | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | २) लेखापरिक्षकांनी विशेष अहवाल तयार करूनही सदरचे विशेष अहवाल निबंधकाकडे सादर केलेले नाहीत. तसेच ज्या लेखापरीक्षकांनी लेखापरीक्षणाअंती संस्थेत गैरव्यवहार/ अपहार निदर्शनास येवूनही विशेष अहवाल संबंधीत निबंधकांकडे सादर केलेला नाही अशा लेखापरिक्षकांचे विरुध्द कायदेशीर कारवाई प्रस्तावित करून, अशा लेखापरिक्षकांची यादी संस्थांचे यादीसह व विशेष अहवालाचे तपशिलासह विभागीय सहनिबंधक (लेखापरीक्षण) व सहकार आयुक्तालयास सादर करावी. | जिल्हा उपनिबंधक/ जिल्हा विशेष लेखापरीक्षक | |
| | | ३) ज्या निबंधकानी विशेष अहवालावर कारवाई केलेली नाही त्यांचे विरुध्द कारवाई प्रस्तावित करून त्यांची यादी संस्थाचे नावासह व विशेष अहवालाचे तपशिलासह विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था व सहकार आयुक्तालयास सादर करावी. | जिल्हा विशेष लेखापरीक्षक/ विभागीय सहनिबंधक (लेप)/ प्रशासन | |
| | | ४) राज्यस्तरीय संस्थांचे विशेष अहवालाची यादी संस्था व लेखापरिक्षकाचे नावासह सहकार आयुक्तालयातील संबंधीत कक्षास तात्काळ सादर करावी. | जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विशेष लेखापरीक्षक | |
| ५ | विनिर्दिष्ट अहवालावर कारवाई | १) ज्या लेखापरिक्षकांनी लेखापरिक्षणाअंती विनिर्दिष्ट अहवाल तयार करूनही असा अहवाल संबंधीत निबंधकांकडे सादर केलेला नाही, तसेच ज्या लेखापरीक्षकांनी लेखापरीक्षणाअंती संस्थेत गैरव्यवहार/ अपहार निदर्शनास येवूनही विनिर्दिष्ट अहवाल संबंधित निबंधकाकडे सादर केलेला नाही अशा लेखापरिक्षकांचे विरुध्द कायदेशीर कारवाई प्रस्तावित करून अशा लेखापरिक्षकांची नावे संस्थांचे यादीसह विनिर्दिष्ट अहवालाचे तपशिलासह विभागीय सहनिबंधक (लेखापरीक्षण) व सहकार आयुक्तालयास सादर करावी. | जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विशेष लेखापरीक्षक | |
| | | २) ज्या निबंधकानी विनिर्दिष्ट अहवाल प्राप्त झाल्यानंतर विनिर्दिष्ट अहवालांत नमूद जबाबदार व्यक्तींविरुध्द कलम ८१ (५) (ब) नुसार फौजदारी कारवाई करणेस लेखापरिक्षकांना प्राधिकृत केलेले नाही त्या संबंधीत निबंधकांवर कारवाई प्रस्तावित करून अशा निबंधकांची नावे संस्थांचे यादीसह विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था व सहकार आयुक्तालयास | जिल्हा विशेष लेखापरीक्षक/ विभागीय सहनिबंधक (लेप)/ प्रशासन<br>जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विशेष | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | सादर करावेत.<br>३) ज्या लेखापरिक्षकांनी प्राधिकृत करूनही पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल केलेला नाही त्याचेविरुध्द कारवाई प्रस्तावित करून त्याची यादी संस्थेचे नावासह विभागीय सहनिबंधक (लेखापरीक्षण) व सहकार आयुक्तालयास सादर करावी.<br>४) राज्यस्तरिय संस्थांचे विनिर्दिष्ट अहवालांच्या प्रती संस्थांच्या यादीसह सहकार आयुक्तालयातील संबंधीत कक्षास तात्काळ सादर कराव्यात. | लेखापरीक्षक<br><br>जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विशेष लेखापरीक्षक | |
| ६ | कलम ८१(१) (अ) प्रथम परंतूका नुसार लेखापरिक्षण | १) ज्या लेखापरिक्षकांनी निबंधकाने कलम ८१ (१) (अ) चे प्रथम परंतूका नुसार आदेश निर्गमीत करूनही लेखापरिक्षण पूर्ण करून लेखापरिक्षण अहवाल सादर केलेले नाहीत त्या लेखापरीक्षकाचे विरुध्द कारवाई प्रस्तावित करून त्यांचे नावाची यादी संस्थेचे नावासह विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था व सहकार आयुक्तालयास सादर करावी.<br>२) राज्यस्तरीय संस्थांची यादी व माहिती सहकार आयुक्तालयास तात्काळ सादर करावी. | जिल्हा उपनिबंधक/ जिल्हा विशेष लेखापरीक्षक | |
| ७ | कलम ८१(६) अन्वये फेरलेखापरिक्षण, कलम ८१(३) (ब) नुसार भरारी पथक लेखापरिक्षक नियुक्ती व कलम ८१ (३) (क) नुसार चाचणी लेखापरीक्षक नियुक्ती करूनही लेखापरिक्षण न करणाऱ्या सनदी/ परिव्यय लेखापाल, सनदी / परिव्यय लेखापाल फर्म, प्रमाणीत लेखापरीक्षक व शासकिय लेखापरीक्षकांविरुध्द कारवाई करणे. | १) कलम ८१(६) नुसार फेरलेखापरिक्षण, कलम ८१(३) (क) अन्वये भरारी पथक तपासणी, कलम ८१ (३) (ब) नुसार चाचणी लेखापरीक्षणासाठी लेखापरीक्षक नियुक्ती करूनही लेखापरिक्षण न करणाऱ्या सनदी / परिव्यय लेखापाल, सनदी/ परिव्यय लेखापाल फर्म, प्रमाणीत लेखापरीक्षकां विरुध्द कारवाई करणे व त्यांना लेखापरिक्षकाचे नामतालिकेवरून कमी करणे बाबत प्रस्ताव सहकार आयुक्तालयास तात्काळ सादर करावेत.<br>२) वरील अनुक्रमांक १ नुसार लेखापरीक्षण पूर्ण न करणा-या शासकिय लेखापरिक्षका विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा नियमा नुसार कारवाईचे प्रस्ताव विभागीय सहनिबंधक (लेखापरीक्षण) व सहकार आयुक्तालयास सादर करावेत. | जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विशेष लेखापरीक्षक<br><br>जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विशेष लेखापरीक्षक | |
| ८ | लेखापरिक्षण अहवाल छाननी, फेरलेखापरीक्षण, चाचणी लेखापरीक्षण, भरारी | १) नियमित लेखापरिक्षण अहवाल छाननीअंती, फेरलेखापरीक्षण, चाचणी लेखापरीक्षण व भरारी पथक तपासणीअंती आर्थिक गैरव्यवहार व अपहार आढळून | जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विशेष लेखापरीक्षक | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | पथक तपासणी अंती आर्थिक गैरव्यवहार व अपहार आढळून आलेल्या प्रकरणातील कसुरदार मूळ लेखापरिक्षकाचे विरुध्द फौजदारी व नामतालिकेवरुन कमी करण्याची कारवाई करणे बाबत. | आलेल्या संस्थांचे बाबतीत मूळ लेखापरिक्षकाचे विरुध्द फौजदारी कारवाई करणेस्तव व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि त्याखालील नियम १९६१ मधील तरतूदीनुसार संबंधीत दोषी लेखापरीक्षकास नामतालिकेवरून कमी करणे बाबतचे प्रस्ताव सहकार आयुक्तालयास तात्काळ सादर करावेत. तसेच या अनुषंगाने सर्व प्रलंबित प्रकरणांबाबत मूळ लेखापरीक्षकाविरुध्द फौजदारी व नामतालिकेवरुन कमी करणेबाबतचे प्रस्ताव तात्काळ आयुक्तालयास सादर करावेत.<br>२) अपहार व गैरव्यवहार दडवून ठेवुन संचालक मंडळाशी संगनमत केले बाबत मूळ सनदी/परिव्यय लेखापाल , सनदी/ परिव्यय लेखापाल फर्म व प्रमाणीत लेखा परिक्षकाचे विरुध्द सहकार आयुक्तालया कडील परिपत्रक **जा.क्र. URB / D-४/Proctn /Accounts/mis Funds/Action /१४४२ /२०१० दि.१४/०७/२०१० व जा.क्र.सआ/ले.प./१२११/प्र.क्र./कक्ष १८/०८ दि.०५/०१/२०११** अन्वये कारवाईचे प्रस्ताव सहकार आयुक्तालयास सादर करावेत. **(सदरची परिपत्रके सोबत जोडली आहेत).** | जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विशेष लेखापरीक्षक | |
| ९. | नामतालिकेवर नसतांना केलेले लेखापरीक्षणाबाबत | १. जे सनदी / परिव्यय लेखापाल, सनदी/परिव्यय लेखापाल फर्म व प्रमाणित लेखापरीक्षक हे राज्य शासनाचे मान्यता दिलेल्या नामतालिकेवर नाहीत त्यांनी सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण केलेले असल्यास त्याचे विरुध्द भारतीय दंड संहीते मधील तरतूदीनुसार कारवाई करणेबाबत सविस्तर प्रस्ताव विभागीय सहनिबंधकांनी वस्तुस्थिती दर्शक, स्वयंस्पष्ट व अचूक कारवाई सूचक अभिप्रायासह सहकार आयुक्तालयास सादर करावेत.<br>२. अशा संस्थांचे केलेले लेखापरीक्षण रद्द करुन पुनश्च: लेखापरीक्षणासाठी कलम ८१ (१) (अ) च्या प्रथम परंतुका अन्वये आदेश निर्गमित करणेत यावेत.<br>३. ज्या संस्थांनी नामतालीकेवर नसणा-या लेखापरीक्षकांकडून लेखापरीक्षण करुन | जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विशेष लेखापरीक्षक<br>विभागीय सहनिबंधक (लेप)/ प्रशासन | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | घेतलेले आहे अशा संस्थांविरुध्द कारवाई करणेत यावी. राज्यस्तरीय संस्थांचे प्रस्ताव सहकार आयुक्तालयास सादर करावेत.<br>अशा संस्थांनी सदर लेखापरीक्षकांना लेखापरीक्षण शुल्क अदा केलेले आहेत त्यांचेकडून सदरचे लेखापरीक्षण शुल्क बँकेस कर्ज देणा-या वित्तीय संस्थेच्या व्याजदराने किंवा संस्थेच्या महत्तम व्याजदराने, थकित दंड व्याजासह चक्रवाढ पध्दती व्याजदराने वसूल करावे. संचालक मंडळाने बँकेत अशा रक्कमांचा प्रत्यक्ष भरणा करावा व तसे संबंधित जिल्हा उपनिबंधकास कळविण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी. सदर बाबत वेळोवेळी आढावा घेणेत यावा. | | |
| १० | सेवानिवृत्त शासकीय लेखापरीक्षकांनी लेखापरीक्षण केलेबाबत | १. शासकीय लेखापरीक्षकांना हे शासकीय सेवेत असेपर्यतच लेखापरीक्षक नामतालिकेवर राहता येते. सेवानिवृत्ती नंतर त्यांना नामतालिकेवरील शासकीय लेखापरीक्षक म्हणून लेखापरीक्षण करता येत नाही. अशा सेवानिवृत्त शासकीय लेखापरीक्षकांनी सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण केले असल्यास त्यांचेविरुध्द भारतीय दंड संहितेनुसार कारवाई करावी.<br>२. अशा लेखापरीक्षकांनी सेवानिवृत्तीनंतर लेखापरीक्षण सुरु करुन पूर्ण केलेले आहे अशा संस्थाचे लेखापरीक्षण करणेस्तव कलम ८१ (१) (अ) प्रथम परंतुकानुसार आदेश निर्गमीत करावेत.<br>अशा लेखापरीक्षकांनी लेखापरीक्षण शुल्क स्वत: वसूल करुन स्वत: स्विकारलेले असल्यास सदरचे शुल्क त्याचेकडून संबंधीत संस्थेने संस्थेच्या महत्तम व्याजदर दंडव्याज व चक्रवाढ व्याजदराने वसूल करावे. सदर लेखापरीक्षकांनी सदर लेखापरीक्षण शुल्क रक्कम परत न केलेस सदरचे लेखापरीक्षण शुल्क संचालक मंडळाकडून वसूल करुन उपरोक्त प्रमाणे संस्थेच्या बँक खात्यामध्ये भरणा करावी. तसे संबंधित जिल्हा उपनिबंधकास कळविण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी. सदरचा वेळोवेळी आढावा घेणेत यावा. | | |
| ११ | राज्यस्तरीय संस्थामध्ये | १) राज्यस्तरीय संस्थामध्ये अपहार / गैरव्यवहार प्रकरणातील विनिर्दिष्ट व | जिल्हा उपनिबंधक, | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | अपहार प्रकरणातील विनिर्दिष्ट व विशेष अहवालाची यादी अहवालासह सहकार आयुक्तालयास सादर करणे. | विशेष अहवालाची यादी सदर अहवालांसह सहकार आयुक्तालयास संबंधीत कक्ष अधिका-यांना तात्काळ सादर करावी. | जिल्हा विशेष लेखापरीक्षक | |
| १२ | लेखापरिक्षण वर्गवारी गुण तक्ता पडताळणी करून चुकीचा लेखापरिक्षण वर्गवारी दिलेची पडताळणी करणे. | १) लेखापरिक्षण अहवाल छाननी करतांना लेखापरिक्षण वर्गवारीच्या गुण तक्त्याची पडताळणी करावी,पडताळणी अंती चुकीचे लेखापरिक्षण वर्गवारी प्रदान केली असल्यास अशा लेखापरिक्षकाची यादी संस्थेचे नावासह व तपशिलासह सहकार आयुक्तालयास सादर करावी.<br>२) चुकीचा लेखापरिक्षण वर्गवारी देणाऱ्या संबंधीत लेखापरिक्षकाचे नाव नामतालीकेवरून कमी करणे बाबत सहकार आयुक्तालयास प्रस्ताव सादर करावा.<br>३) तसेच चुकीची वर्गवारी संस्थेस प्रदान केलेमुळे संस्थेची खरी व वास्तवातील सांपत्तीक स्थिती न दर्शविलेमुळे त्यांचेविरुध्द भारतीय दंड संहितेनुसार वस्तुस्थितीदर्शक, अचूक कारवाईसूचक प्रस्ताव विभागीय सहनिबंधक यांनी सादर करावा. | जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विशेष लेखापरीक्षक<br><br>जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विशेष लेखापरीक्षक | |
| १३ | शासन निर्णय दि.२९/१०/२०१४ नुसार लेखापरीक्षण शुल्क आकारणी न करता चुकीच्या पध्दतीने किंवा या कार्यालयाचे परिपत्रक दि.१५/५/१९९२ नुसार किंवा त्यापेक्षाही जास्त लेखापरिक्षक शुल्क आकारणी करून जास्तीचे लेखापरीक्षण शुल्क वसुली करणाऱ्या सनदी/परिव्यय लेखापाल, सनदी/ परिव्यय लेखापाल फर्म व प्रमाणित लेखापरिक्षका विरुध्द कारवाई करणे. | शासन निर्णय दि.२९/१०/२०१४ नुसार लेखापरीक्षण शुल्क आकारणी न करता चुकीच्या पध्दतीने किंवा या कार्यालयाचे परिपत्रक दि.१५/५/१९९२ नुसार लेखापरिक्षण शुल्क आकारणी करून जास्तीचे लेखापरीक्षण शुल्क वसुली करणाऱ्या सनदी/परिव्यय लेखापाल, सनदी/ परिव्यय लेखापाल फर्म व प्रमाणित लेखापरिक्षका विरुध्द खालीलप्रमाणे कारवाई करण्याचे प्रस्ताव सहकार आयुक्तालयास तात्काळ सादर करावेत. तथापी सदर कार्यवाही करताना मा.उच्च न्यायालय , खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल याचिका क्र.५९६/२०१५ व ९३५५/२०१५ मधील याचिकाकर्ते वगळून कार्यवाही करावी. मात्र सदर याचिकाकर्त्यांनी या कार्यालयाचे परिपत्रक दि.१५/०५/१९९२ मधील दरापेक्षा जास्त लेखापरीक्षण शुल्क घेतले असल्यास जास्तीचे शुल्क वसुलीबाबत कारवाई करावी. याबाबत खालील प्रमाणे कारवाई प्रस्तावित करावी.<br>१) उपरोक्त अनुषंगाने नागरी सहकारी पतसंस्था, कर्मचारी पतसंस्था व विविध | जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विशेष लेखापरीक्षक | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | कार्यकारी सहकारी संस्था या संस्थांचे सन २०१५-१६ ते सन २०२१-२२ या कालावधीचे लेखापरीक्षणासाठी अदा केलेल्या लेखापरीक्षण शुल्काबाबत संस्थानिहाय शासकीय लेखापरीक्षकाची नेमणूक करुन तपासणी करण्यात यावी.<br>२) अशा लेखापरीक्षण शुल्क न घेतलेल्या लेखापरिक्षकांची नावे नामतालीकेतून कमी करण्याचा प्रस्ताव सहकार आयुक्तालयास सादर करावा.<br>३) जास्तीची लेखापरिक्षण शुल्क वसुल करून घेतलेली रक्कम सरळ व्याजदर , थकित व्याजदर, असे चक्रवाढ पध्दतीने किंवा १८ टक्के व्याज दराने चक्रवाढ पध्दतीने सदरची रक्कम वसूल करुन घेणेबाबत संबंधीत लेखापरिक्षकाविरुध्द कारवाईचे प्रस्ताव या कार्यालयास सादर करावेत.<br>४) जास्तीची रक्कम ही अपहारीत रक्कम समजन्यात येवुन संबंधीत लेखापरिक्षका विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करणेस्तव संबंधित निबंधकाकडे व सहकार आयुक्तालयास प्रस्ताव सादर करावेत. तथापी सदरची बाब जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांनी तपासून संबंधीत निबंधक व सहकार आयुक्तालयास सादर करावी.<br>उपरोक्त बाबत सहकार आयुक्तालयाकडून स्वतंत्र सूचना निर्गमित करण्यात येत आहेत. त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात यावी. | जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विशेष लेखापरीक्षक | |
| १४ | शासकीय लेखापरिक्षकांनी नियमीत लेखापरिक्षण अहवाल व दोष दुरूस्ती अहवाल छाननी करणेस नकार दिलेबाबत कारवाई करणे. | ज्या शासकीय लेखापरिक्षकानी नियमीत/ चाचणी/ फेर लेखापरिक्षण अहवाल व दोष दुरूस्ती अहवाल छाननी करणेस नकार दिलेला आहे. त्यांचेविरुध्द प्रशासकीय कार्यवाही करण्याबाबतचे प्रस्ताव विभागीय सहनिबंधक (लेखापरीक्षण) यांचेकडे व सहकार आयुक्तालयास सादर करावेत. | जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विशेष लेखापरीक्षक | |
| १५ | थकित लेखापरिक्षण शुल्क वसुली कलम १५५ | १). लेखापरिक्षण शुल्क थकित असलेल्या संस्था कार्यक्षेत्र राज्यस्तरीय ,विभागस्तरीय ,जिल्हास्तरीय व तालुका / वॉर्ड स्तरीय संस्थांच्या यादया संबंधीत क्षेत्रीय निबंधकांना संस्था प्रकार निहाय सादर कराव्यात. राज्यस्तरीय संस्थांची यादी आयुक्तालयातील संबंधीत कार्यासन अधिकाऱ्यांना कलम १५५ नुसार कारवाई | जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विशेष लेखापरीक्षक | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | करणेस्तव सादर करावी .<br>२) या मध्ये चालू, बंद, प्रशासक/अवसायक नियुक्त, नोंदणी रद्द, कस्टोडीयन नियुक्त अशी विगतवारी करावी.<br>३) सदर विगतवारी मध्ये मालमत्ता असलेल्या व मालमत्ता नसलेल्या संस्था अशीही विगतवारी करावी.<br>४) मालमत्ता नसलेल्या संस्थाबाबत कलम १५५ नुसार कारवाई सदर संस्थाच्या संचालक मंडळ सदस्याचे वैयक्तीक मालमत्तेचे उतारे जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांनी संबंधीत क्षेत्रिय निबंधकाना व सहकार आयुक्तालयातील संबंधीत कक्ष अधिका-यांना सादर करावेत. | | |
| १६ | उपरोक्त अनुक्रमांक १ ते १५ बाबत अहवाल सादर करणे. | १. उपरोक्त परिच्छेद क्र. १ ते १५ बाबत जिल्हा उपनिबंधक व जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांनी पडताळणी करुन संयुक्त स्वाक्षरीने संबंधीत विभागीय सहनिबंधक व विभागीय सहनिबंधक (लेखापरीक्षण) यांना **दि.१५/३/२०२३** पर्यंत अहवाल सादर करावा.<br>२. सदर अहवालाची आगाऊ प्रत आयुक्तालयास सादर करावी. तसेच जिल्हा उपनिबंधक व जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांचे अहवालावर विभागीय सहनिबंधक व विभागीय सहनिबंधक (लेखापरीक्षण) यांनी संयुक्त स्वाक्षरीने वस्तुस्थितीदर्शक, स्वयंस्पष्ट व अचूक कारवाईसूचक, अभिप्रायात्मक अहवाल या कार्यालयास **दि.१५/३/२०२३** पर्यंत सादर करावा.<br>३. पुढील बैठकीपूर्वी ५ दिवस आधी अनुपालन अहवाल सादर करावा. पुढील बैठकीमध्ये विषय क्र.१ हा मागील बैठकीचे इतिवृत्तातील सूचनांचे अनुपालन अहवाल वाचून कायम करणे. | विभागीय सहनिबंधक/ विभागीय सहनिबंधक (लेखापरीक्षण)/ जिल्हा उपनिबंधक/ जिल्हा विशेष लेखापरीक्षक | |

**(ज्ञानदेव मुकणे)**
**अपर आयुक्त व विशेष निबंधक,**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे**

No. URB/D-4/Proctn/Accounts/mis
Funds/Action/2010
Office of the,
Commissioner for Cooperation and
Registrar, Cooperative Societies,
Maharashtra State Pune
Date- 14 / 07 /2010

# CIRCULAR

**Subject- Launching of prosecution on account of Misutilisation and Misappropriation of Funds of Cooperative Societies.**

Read - 1. Government of Maharashtra, Agriculture and Cooperation Department, No. CCL1270/84605/C-7, Sachivalaya Annexe, Bombay - 32 Dated 13th June 1972

2. No. ADT-552 of 1972, Office of the Cooperative Societies, M.S. Poona, The 5th September, 1972
3. Government of Maharashtra, Home Department Circular No CII, 3769 /52181 VII.A Sachivalaya Bombay -32 7th August 1972
4. Government of Maharashtra, Agriculture and Cooperation Department. Circular No.C3M-1381/30472/6-C Mantralaya Annexe Bombay-32. Dated 12th June1981.
5. Government of Maharashtra Agriculture and Cooperation Department Sachivalaya Annexe Bombay -32, 2nd February 1971, Circular No. CCI - 1270-34605-C-3,
6. Government of Maharashtra, Home Department Government Circular No. CII -0108/Pra.Kra -11/POL-12 Mantralaya Mumbai -32 Dated 14th January 2008

The Circular mentioned above outline the need and modalities of launching and monitoring prosecution against the concerned regarding misutilisation and misappropriation of funds of Cooperative Societies, the instances which came to be detected during audit process. There are instances seen in recent years that misutilisation and misappropriation of funds of Cooperative Societies are ascertained in re-audit, Special audit. Test audit and report of flying squad which is taken subsequently by Registrar. However Statutory Audit report does not reflect misutilisation and misappropriation of funds of Cooperative Society of the same year.

OFFICE OF THE DISTRICT SPECIAL
AUDITOR CLASS I CO-OPERATIVE
SOCI[illegible]
IN[illegible]
DATE 30 JUL 2010
BRANCH

However, recently instances are reported where the auditors entrusted with the duty of verification and audit have been indulging in acts of misreporting consisting of two broad categories. The First is non reporting of serious instances which are detected/ could have been detected during audit and timely reporting of which could save further complications which adversely affect the well being of members, depositors and society at large. The second category is misreporting of instances which present an altogether different picture of the status and affairs of the society, which also due to this kind of misreporting tends to jeopardize the well being of members, depositors and society at large. The first is called Suppression of Truth and the other is Representation of falsehood. There may be a possibility that these two may overlap and there may be a string of instances wherein both are present.

These instances are to be differentiated from mere negligence, though amounting to professional lapse or shortcoming, does not amount to fraudulent reporting consisting of suppression of truth or suggestion of falsehood which either singly or jointly constitute fraud, which is an offence in itself. As such, the following guidelines are issued to take care of fraudulent reporting and not for mere negligence in conducting audit process or reporting the outcome of Audit process.

Where fraudulent reporting is observed, it be ascertained whether the concerned professional is prima facie liable under conspiracy along with the other persons who have actually committed the acts of commission and omission while conducting the affairs of society. If that is so, the concerned auditor or person responsible for verification will be liable jointly and severally with the other offenders. However, where the element of conspiracy cannot be substantiated then it should be seen whether the concerned professional, who is also a Public servant while conducting his statutory responsibility, has conducted himself to protect any person from legal punishment or to save any person from punishment or to save any person from punishment of a higher degree and has tried to bring such person under another kind of a higher degree and has tried to bring such person under another kind of punishment which is of a lesser degree. This kind of conduct is covered under Section 217 of Indian Penal Code, 1860 which provides for an offence by a Public Servant disobeying direction of law with intent to save any person from punishment or any property from forfeiture.

In the present circumstances, there is a need to analyze deviations from statutory duty minutely to ascertain whether the delinquent office bearers employees and other persons are tried to be protected by professionals who themselves are responsible for an early detection of frauds and other serious

misdeeds on part of people entrusted with the management of the Societies. As such, this circular is issued to take care of fraudulent reporting by professionals where conspiracy is involved or otherwise.

(Rajagopal Devara)
Commissioner for Cooperation and
Registrar Cooperative Societies,
Maharashtra State, Pune.

**Copy forwarded for information :-**

1. The Chief Secretary , Maharashtra State , Mantralaya Mumbai -400 032.
2. The Additional Chief Secretary, (Home), Home Department, Maharashtra State, Mantralaya Mumbai -400 032.
3. The Principal Secretary, (Cooperation & Marketing), Maharashstra State, Mantralaya Mumbai -400 032.

**Copy forwarded for information and necessary action to:-**

1. Divisional Joint Registrar, Cooperative Societies (All)
2. Divisional Joint Registrar, Cooperative Societies (Audit) (All)
3. District Deputy Registrar, Cooperative Societies, (All)
4. District Special Auditor, Cooperative Societies, (All)

14

सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे
कार्यालय. नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११००१

दुरध्वनी क्र. ०२०-२६१२ ७२१७, २६१२ २८४६/४७

फॅक्स क्र. ०२०-२६१३ ३०८२, २६१२ ७००४
Email :- comm_audit@rediffmail.com

जा.क्र.सआ/ले.प./१२११/प्र.क्र.०८ /कक्ष-१८.
दिनांक :- ०५ जानेवारी, २०११.

## परिपत्रक

विषय:- सहकारी संस्थाचे लेखापरिक्षण करताना आढळून आलेले गैरव्यवहार अफरातफर याबाबत वेळीच गुन्हे दाखल करणे बाबत...

संदर्भ:- या कार्यालयाचे इंग्रजी परिपत्रक No. URB/D-४/Proctn /Accounts / mis Funds/Action/२०१०/१४४२, Date १४/०७/२०१०

महाराष्ट्रातील सहकारी चळवळ देशात आदर्शयुक्त ठरलेली आहे. सहकारी चळवळ विशेषतः ग्रामीण भागामध्ये विकासाला खुपच पोषक ठरली आहे. सहकारी संस्था / बँकामध्ये जमा असलेल्या ठेवी या प्रामुख्याने सर्वसामान्यांच्या आहेत. महाराष्ट्र सहकारी कायद्यानुसार नोंदणीकृत पात्र सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण कायदा कलम ८१(१)(अ) व ८१(१)(ब) नुसार दरवर्षी होणे आवश्यक असून ८१(१)(अ) अंतर्गत असलेल्या संस्थांचे लेखापरीक्षणा बाबत निबंधकावर जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे व ८१(१)(ब) अंतर्गत असलेल्या संस्थांचे लेखापरीक्षणा बाबत संबंधीत सहकारी संस्थेवर जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. सदर संस्थाचे लेखापरिक्षण योग्य रितीने अचुक करणे आवश्यक आहे. संस्थामध्ये लेखापरिक्षण करतेवेळी आढळुन आलेले गैरव्यवहार, गैरप्रकार व अफरातफर याबाबत फौजदारी गुन्हे वेळेत दाखल करणे आवश्यक असते. तरी देखील काही संस्थाच्या बाबतीत अफरातफर घडुनदेखील फौजदारी गुन्हे दाखल न केलेले निर्दशनास येते. त्यामुळेच या कार्यालयाचे परिपत्रक No.URB/D-४/Proctn/Accounts/mis funds/Action/२०१०/१४४२, Date १४/०७/२०१० अन्वये सबंधित मुळ लेखापरिक्षकांवर कारवाई करण्याबाबत परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहे. परंतु काही संस्थाच्या बाबतीत लेखापरिक्षणामध्ये आढळुन आलेल्या गैरव्यवहार, गैरप्रकार व अफरातफरबाबत फौजदारी गुन्हे वेळीच दाखल केले नसल्याचे निर्दशनास आलेले आहे. तेव्हा लेखापरिक्षण करतेवेळी गैरव्यवहार, गैरप्रकार व अफरातफर निदर्शनास आल्याक्षणी त्वरीत फौजदारी गुन्हे (एफ.आय.आर.) वेळीच दाखल करणे आवश्यक आहे.

संबंधीत लेखापरीक्षक व सनदी लेखापाल यांनी या परिपत्रकाप्रमाणे कारवाई करणेस दिरंगाई केल्यास त्यांच्यावर तात्काळ कारवाई करण्यात येईल, याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

स. नि. (ले.प) पुणे विभाग, पुणे
आवक क्र. ५-२ दिनांक ७/१/११

( राजगोपाल देवरा )
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना :-
१) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
२) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरिक्षण) (सर्व) पुणे
३) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
४) जिल्हा विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था (सर्व)
५) वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिल ऑफ चार्टर्ड अकौंटंटस् ऑफ इंडिया मुंबई

c:\lahande\wat\circular

२८८